**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्र.रानिआ/मनपा २०१२/प्र.क्र. २४/का.०५,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०९/१०/२०१२.

## आदेश

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी मतदाराची ओळख पटल्यानंतर त्या मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीला न मिटणारी शाई वापरुन निशाणी करण्याबाबत तसेच पुर्नमतदानाच्यावेळी मधल्या बोटाला शाई लावण्याबाबत मतदान केंद्रांध्यक्षांसाठीच्या निदेश पुस्तिकेमध्ये सूचना दिल्या आहेत. काही प्रसंगी त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रामध्ये लोकसभा / विधानसभेची, स्थानिक स्वराज्य संस्थेची अथवा अन्य निवडणूक नुकतीच पार पडलेली असते व मतदान केलेल्या मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर न मिटणाऱ्या शाईची निशाणी मिटलेली नसते. अशावेळी मतदाराच्या कोणत्या बोटाला शाई लावावी याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे विचारणा करण्यात येते.

वरील बाबीचा विचार करुन राज्य निवडणूक आयोग असे आदेश देत आहे की, ज्यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रामध्ये लोकसभा / विधानसभेची, स्थानिक स्वराज्य संस्थेची अथवा अन्य निवडणूक नुकतीच पार पडलेली असेल व मतदान केलेल्या मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर न मिटणाऱ्या शाईची निशाणी मिटलेली नसेल त्यावेळी त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक / पोटनिवडणुकीमध्ये मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीऐवजी मधल्या बोटाला शाई लावण्यात यावी. जर मधल्या बोटाला देखील शाईची निशाणी असेल तर जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणुकीमध्ये मतदाराच्या कोणत्या बोटाला शाई लावण्यात येईल याबाबत आदेश काढावेत आणि त्यानुसार स्पष्ट सूचना सर्व संबंधित मतदान केंद्राध्यक्षांना द्याव्यात.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( वि. मा. पानसरे )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.

D:\D 5\Mira-Bhaindar ele.doc/mahale